वृत्तपत्राचे नांव :– सामना

वृत्तपत्र प्रकाशनाचे ठिकाण :– मुंबई

वृत्तपत्र पान क :– 2

दिनांक :–29 / 12 / 2009

## संस्कार धन

# वेदांचा मांडलिक संदेश



*मित्रस्याहं चक्षुषा सर्वाणि भूतानि समीक्षे ।*
*मित्रस्य चक्षुषा समीक्षामहे ।।*

माझी जीवनविषयक दृष्टी विशाल एवम् दृढ - स्थिर व्हावी सर्व प्राणी माझ्याकडे मित्राच्या नात्यातून पाहावेत. तसेच सर्व प्राण्यांविषयी माझ्या मनात आपुलकी - मैत्रीचाच भाव असावा. आमचे परस्पराचे व्यवहार मैत्रीपूर्ण, सुसंवादी असावेत.

*मा भ्राता भ्रातरं*
*द्विक्षन्मा स्वरारमुत स्वसा ।*
*सम्यञ्चः सव्रता भूत्वा वाचं वदत भद्रया ।।*

भावा-भावांनी (बंधूंनी) परस्परांचा द्वेष न करता सलोख्याने वागावे. बहिणीने बहिणीशी ईर्षा करू नये. आपण सर्वांनी एकमताने एकविचाराने आणि एका ध्येयाने चलण्याचा संकल्प करून परस्परांशी मधुवाणी संवाद करावा.

*समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।*
*समानमस्तु वो मनो यथा वः सुसहासति ।।*

तुमचे सर्वांचे विचार, संकल्प एकाच प्रकारचे एका दिशेने जाणारे असावेत. तुमची अंतःकरणं, हृदयं, मनं समान असावीत ज्यायोगें तुम्ही आपले कार्य सर्वांमिळून एका जिवाभावाने संघटितपणे करू शकाल.

■ गजानन भाटवडेकर